आतुर

क्षण हे सांजेचे, किती जीवघेणे
हिरमुसली फुले परी, गंधांचे रहाणे ॥ १ ॥

उडाली धूळ वाऱ्यावरी, ते शहारे
चाहूल नसूनही वाळूत, खुलली पैंजणे ॥ २ ॥

उशाला नित संध्या, अन उसासे
मनास पाडे भूल, आठव चांदणे ॥ ३ ॥

गच्च आभाळ दाटे, काहूर उठे
सावरता तुझ्या स्मृतींची, गवसती निशाणे ॥ ४ ॥

इथे मी तिथे, सखाचंद्र झुरतो
नसणे तुझें उद्याचे, नवे बहाणे ॥ ५ ॥

© सपु, www.saarthbodh.com

सचिन कुलकर्णी